# हवामान आधारीत कृषि सल्ला
## ग्रामिण कृषि मौसम सेवा, ऐएमएफयु, राहुरी,
## कृषि विद्या विभाग, मफुकृवि, राहुरी.

दूरध्वनी : ०२४२६ २४३२३९ ईमेल:rahuri.amfu@gmail.com


**४३) हवामान अंदाजावर आधारित कृषी सल्ला समितीची साप्ताहिक बैठक दि. २६.०७.२०२४**

जिल्हा : अहमदनगर

| मागील आठवड्यातील हवामान (१९/०७/२०२४ ते २५/०७/२०२४) | | | | | | | हवामान घटक | पुढील पाच दिवसांचा हवामान अंदाज (२७/०७/२०२४ ते ३१/०७/२०२४) | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १९ | २० | २१ | २२ | २३ | २४ | २५ | दिनांक | २७ | २८ | २९ | ३० | ३१ |
| ०.० | ०.० | ०.४ | १.२ | ०.८ | १.६ | २१.४ | पाऊस (मिमी) | २० | ३५ | १४ | ८ | १३ |
| ३०.४ | ३०.८ | ३०.६ | ३०.२ | २९.० | २८.६ | २९.२ | कमाल तापमान (अंसे) | ३० | ३१ | ३२ | ३२ | ३३ |
| २३.९ | २३.७ | २३.५ | २३.९ | २४.१ | २३.७ | २२.५ | किमान तापमान (अंसे) | २६ | २६ | २६ | २७ | २७ |
| २.० | ०.० | २.० | २.० | २.० | २.० | ६.० | ढग स्थिती (आकाश) | ८ | ८ | ८ | ८ | ८ |
| ८४ | ८१ | ८९ | ८७ | ८३ | ८७ | ९५ | सकाळची सापेक्ष आर्द्रता (%) | ८८ | ९० | ९१ | ९० | ८८ |
| ५९ | ५९ | ६६ | ७० | ७० | ६५ | ७२ | दुपारची सापेक्ष आर्द्रता (%) | ७९ | ८२ | ८१ | ७९ | ७९ |
| १.९ | २.६ | १.९ | ५.१ | ३.७ | ३.६ | ३.३ | वाऱ्याचा वेग (किमी/ तास) | २६ | २१ | २१ | २२ | २३ |

**हवामान अंदाजावर आधारित कृषी सल्ला**

| पीक | अवस्था | कृषि विषयक सल्ला |
|---|---|---|
| हवामान सारांश | | प्रादेशिक हवामान केंद्र, मुंबई यांचेकडून प्राप्त झालेल्या हवामान अंदाजानुसार पुढील पाच दिवस आकाश अंशतः ढगाळ राहण्याची शक्यता आहे तसेच पुढील पाच दिवस काही ठिकाणी हलका ते माध्यम पाऊस पडण्याची शक्यता आहे. |
| सामान्य सल्ला | | हवामान अंदाज आधारित कृषी सल्ला व हवामानचा पूर्वानुमानाकरीता मेघदुत मोबाईल ॲपचा वापर करावा. वीजेच्या अंदाजाचा पूर्वानुमानाकरीता दामिनी मोबाईल ॲपचा वापर करावा. |
| संदेश | | मूग: शेतामध्ये वापसा असताना दुसरी कोळपणी करून घ्यावी आणि त्या नंतर खुरपणी करून घ्यावी. |
| कापूस | उगवण ते पाते लागणे | बीटी कापूस बोंडअळयांना प्रतिकारक्षम राहाण्यासाठी बीटी कपाशीच्या सभोवती ५ ओळी किंवा २० टक्के बिगर बीटी वाणाची लागवड करावी.<br>रस शोषणाऱ्या किडींच्या नियंत्रणासाठी मित्र किटकांचे संगोपन करण्यासाठी मिश्र पीक, आंतर पीक, सापळा पिके म्हणून मका, चवळी, झेंडूची लागवड करावी. |
| ऊस | लागवड | नवीन आडसाली ऊस लागवडीसाठी रान तयार असल्यास १५ जुलै नंतर लागवडीस सुरुवात करावी. लागवडीसाठी को-८६०३२ (निरा), को.एम.०२६५ (फुले-२६५), को.व्ही.एम.आय.९८०५ वापरावे. बेणे ९ ते १० महिन्याचे कोवळे, रसरशीत, रोग व किडमुक्त, लांब कांड्याचे वापरावे. लागवडीसाठी दोन डोळयांची टिपरी वापरावी. लागवडी अगोदर हेक्टरी ३० टन (६० गाड्या) शेणखत द्यावे. लागणीचे वेळी ४० किलो नत्र (साधारण ८७ किलो युरिया), ८५ किलो स्फुरद (साधारण ५३१ किलो सिंगल सुपर फॉस्फेट) आणि ८५ किलो पालाश (साधारण १४२ किलो म्यु.ऑ.पोटॅश) दर हेक्टरी लागणीच्या वेळी सरीतून द्यावे. |
| उडीद | पिकास फांद्या फुटताना | जर शेंगा पोखरणारी अळीचे पतंग कामगंध सापळयामध्ये सापडत असेल तर ट्रायकोग्रामा याचे एकरी २५००० प्रौढ सोडावेत. शेंगा पोखरणारी अळीचे अंडी किवा लहान अळया दिसून आल्यास ५ % निबोळी अर्कची फवारणी करावी. पावसाचे उघडीप पाहून व वारा शांत असताना फवारणी करावी. |
| मूग | फाद्या फुटणे | शेतामध्ये वापसा असताना दुसरी कोळपणी करून घ्यावी आणि त्या नंतर खुरपणी करून घ्यावी. |
| सोयाबीन | रोप अवस्था | स्पोडोप्टेरा अळीच्या नियंत्रणासाठी मुख्य पिकाचे कडेने एरंडीची एक ओळ सापळा पिक म्हणून पेरावी.<br>स्पोडोप्टेरा अळीच्या उपद्रवाचा आगाऊ अंदाज घेऊन नुकसान टाळण्यासाठी हेक्टरी ५ स्पोडोलूरचा वापर करण्यात आलेले फेरोमेन सापळे नियंत्रणासाठी वापरावेत. |
| तूर | उगवण | कोळपयाच्या सहाय्याने पीक ३० ते ३५ दिवसाचे असताना दुसरी कोळपणी करण्याचे सांगितले आहे.<br>वांझ रोगाचा प्रसार रोखण्यासाठी पीक २० व ४० दिवसाचे असताना सल्फर ५०% (WP) ३० ग्रॅम प्रति १० लिटर पाणी अथवा निम ऑइल ४० मिली १० लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी. पावसाचे उघडीप पाहून व वारा शांत असताना फवारणी करावी. |
| वेलवर्गीय भाजीपाला | | काकडी, कारली, दोडका, घोसाळी, दुधी भोपळा, तांबडा भोपळा<br>फळ माशीच्या नियंत्रणासाठी क्यु-ल्युर कामगंधे सापळे एकरी ५ या प्रमाणात वापरावे. |
| भाजीपाला पिके | | मिरची, वांगी, टोमॅटो, भेंडी, घेवडा, गवार, कांदा, वाल या पिकांची लागवड करून एक महिना झाला असेल तर त्या ठिकाणी खुरपणी करून पिक तण मुक्त करावे, शिफारशीनुसार वरखतांच्या मात्रा द्याव्यात. |
| पशूसंवर्धन | | पावसाळ्यात जनावरे सुरक्षित ठिकाणी बांधावीत. पशुपालकांनी आपल्या भागात कोणत्या प्रकारचे जंत आहेत याची माहिती करून घ्यावी. जंतांचे प्रकार जाणून घेण्यासाठी जनावरांच्या शेणाची तपासणी करून घ्यावी. |

दूरध्वनी : ०२४२६ २४३२३९ ईमेल:rahuri.amfu@gmail.com


| | | |
|---|---|---|
| | | जंतांचे प्रकार समजल्यावर पशुवैद्यकाच्या सहाय्याने नियंत्रणासाठी व प्रमतिंधात्मक उपायांसाठी उपयुक्त व प्रभावी औषधे निवडावे. जनावरांची रोग प्रतिकारशक्ती वाढवावी. जेणेकरून जंतांच्या वाढीला आळा बसतो. त्यांचे नियंत्रण होते. याकरिता जनावरांना उत्तम संतुलित आहार द्यावा. जनावरांचा गोठा स्वच्छ, कोरडा व हवेशीर ठेवणे व वेळोवेळी निर्जंतुकीकरण करणे महत्त्वाचे आहे. औषधे देतांना औषध योग्य मात्रेतच द्यावे त्याकरता वेष्टनावरील सूचना पाळाव्यात. |

**स्त्रोत** :

१) हवामान पूर्वानुमान : प्रादेशिक हवामान पूर्वानुमान केंद्र, मुंबई.

२) मागील हवामान : भारत मौसम विज्ञान विभाग वेधशाळा पाणी व्यवस्थापन प्रकल्प, मफुकृवि, राहुरी.

ठिकाण : मफुकृवि, राहुरी.

दि. : २६.०७.२०२४

**स्वाक्षरीत**

**प्रमुख अन्वेषक, ग्राकृमौसे, ऐएमएफयु, राहुरी तथा**

**प्रमुख, कृषि विद्या विभाग, मफुकृवि, राहुरी.**